**वाचले :-** (१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.
(२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य-५, दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०.
(४) उपविभागीय अधिकारी, कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी यांचेकडील पत्र क्र.तह./जबाबी/कावि-८९४/२०२०, दि. १४/०७/२०२०.

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर
जा.क्र. क्र.२०२०/मशा/कार्या/नैआ/जिनिक/प्र.क्र.२४/आरआर-1120
सोलापूर दि.१४/०७/२०२०.

**आदेश**

ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी, कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी तथा Incident Commander यांनी उपोद्घोषातील क्रमांक ४ मधील दिनांक १४/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये, माढा तालुक्याची भौगोलीक परिस्थिती व लोकसंख्या यांचा विचार करता आणखी एक कोविड केअर सेंटरची (CCC) आवश्यकता असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र आलेगांव बु.ता.माढा अतिरिक्त कोविड केअर सेंटर (CCC) म्हणून घोषीत करणेस विनंती केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्घोषातील अ.क्र. ३ मधील शासन अधिसुचनेनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये जिल्हाधिकारी सोलापूर यांना सोलापूर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात कोविड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी "सक्षम प्राधिकारी" म्हणून घोषित केले आहे. तसेच नियम १० (ए) अन्वये शासकीय किंवा खाजगी इमारत / मत्ता अलगीकरण आवश्यकतेनुसार नामनिर्देशनाचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, कोरोना विषाणूंचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता, त्यावर नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक असल्याने असे प्रवासी व संशयीत रूग्ण यांना दाखल करण्याकरीता "कोव्हिड केअर सेंटर" निर्माण करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, **मिलिंद शंभरकर, जिल्हाधिकारी सोलापूर तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व उपोद्घोषातील अ.क्र.३ मधील शासन अधिसुचनेनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोविड - १९ उपाययोजना नियम, २०२० मधील निर्देशान्वये सोलापूर जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात कोविड -१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपोद्घोषातील अ.क्र. ३ मधील महाराष्ट्र कोविड - १९ उपाययोजना नियम, २०२० चा नियम १० (ए) नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून खालील विवरणपत्रातील वसाहत/इमारत कोरोना विषाणूंचा संसर्ग व प्रादुर्भाव

रोखण्याकरीता वाचले क्रमांक. १ ते ४ अन्वये खालीलप्रमाणे कोविड केअर सेंटर (CCC) म्हणून घोषित करणेत येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण | संस्थेचे नाव व पत्ता | प्रयोजन |
|---|---|---|---|
| १. | आलेगाव बु. ता.माढा | प्राथमिक आरोग्य केंद्र आलेगाव बु. ता.माढा जि.सोलापूर | कोविड केअर सेंटर (CCC) |

वर नमुद केलेप्रमाणे कोविड केअर सेंटर येथे दाखल करण्यात आलेल्या संशयित / बाधित रुग्णांना चहापान, नाष्टा व भोजन इत्यादी सोयी-सुविधा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात याव्यात. इमारतीमध्ये संशयित / बाधित रुग्णांच्या झोपण्यासाठी अंथरूण व अंघोळीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील ५१ (b), भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८** नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहिल याची नोंद घ्यावी.

सदरचा आदेश आज दिनांक. १४/०७/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

COLLECTOR OF SHOLAPUR

(मिलिंद शंभरकर, भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर**

**प्रति,**

**सर्व संबंधित**

**प्रत :-**

(१) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
(२) पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचेकडे माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर
(४) उपविभागीय अधिकारी, कार्यालय माढा विभाग कुर्डुवाडी यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
(५) तहसिलदार माढा यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
(६) जिल्हा शल्यचिकित्सक सोलापूर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
(७) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर
(८) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग सोलापूर यांचेकडे माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
(९) उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, माढा यांचेकडे माहिती व उचित कार्यवाहीसाठी.